सोमवार दि.१४ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ४०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in




# भगवान भक्ती गडावरून बहीण-भावाची तोफ धडाडली

## वंचित बहुजनांना त्रास द्याल तर हिशोब घेणार-पंकजा मुंडे

## तुम लाख कोशिश करो हमे हराने की,हम दुगनी रफ्तार से निकलेंगे-धनंजय मुंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

मला भगवानगडावरून पंकजा दिसते या स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या विधानाची आपल्याला जाणीव आहे का ? त्याच विधानाला जागत मी संघर्षाला न घाबरता वारसा चालवत आहे. थकलेली नाही. माझा लोकसभेला पराभव झाला ते सहन झाले नसल्यामुळे बीड जिल्ह्यातील पाच लेकरांनी जीव दिला. यावरून माझ्यावर किती जीव आहे हे समजते. याची परतफेड करण्यासाठी माझ्या एका मुलापेक्षा मी तुमच्यावर जीव लावणार. हे तुमचं ऋण फेडणार. आजच्या आपल्या भगवान भक्ती गडावरील मेळाव्याला अठरापगड जातीचे वंचित, बहुजन, मजूर, ऊसतोड कामगार अवघ्या महाराष्ट्रातून आले आहेत. आता मी महाराष्ट्राच्या सर्व कानाकोपऱ्यात फिरणार आहे. आपल्याला आता डाव खेळायचा आहे. म्हणत वंचित बहुजनांना त्रास दिला तर त्यांचा हिशोब घेणार,जात बघून काम करणारी मुंडे साहेबांची औलाद नाही, असे नाव न घेता पंकजाताईंनी विरोधकावर हल्ला चढवला.




आपल्या भाषणात बीडचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे म्हणाले की, येथील मेळाव्याला अठरापगड जातीची जनता भगवान बाबा वरील श्रद्धा व स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांनी चालवलेली दसरा मेळाव्याची परंपरा ही पंकजाताई चालवत आहे. त्यासाठी हे विराट जनतेचे दृश्य दिसत आहे. दसरा सण हा हिंदूचा सर्वात मोठा सण असतो. काही नवीन मेळावे घेणाऱ्यांना प्रभू श्रीराम माहिती पाहिजे. संताने कधी जात पात पाहिली नाही. असा घनाघात मंत्री धनंजय मुंडे यांनी नाव न घेता विरोधकावर केला.

विराट अशा दसरा मेळाव्यास संबोधित करताना पंकजा मुंडे पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्रातील सर्व ऊसतोड कामगारांनो आता तुम्ही खचून जाऊ नका. तुमची लेख तुमच्या पाठीशी खंबीर आहे. येणाऱ्या काळात तुमचे जीवन सुधारण्यासाठी आणि हातातील कोयता सुटण्यासाठी मी काम करणार. तुमचे जीवन बदलल्याशिवाय शेवटचा श्वास घेणार नाही,असेही वचन पंकजाताई मुंडे यांनी व्यासपीठावरून दिले. जातीमध्ये भेद करतात, मुस्लिम, वंचित, बहुजन यांचे रक्त वेगळे आहे का ? असे विचारत,मी जात पाहून काम करत नाही. आणि कधीच कुणावर भेदभाव केला नाही. अशी विरोधकावर जोरदार टीका आमदार पंकजाताई मुंडे यांनी भगवान भक्ती गड दसरा मेळाव्याच्या व्यासपीठावरून केला. आपल्या भाषणात बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे म्हणाले की, स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांनी संघर्ष पाहिला, मीही पाहिला, आणि पंकजाताईनेही पाहिला पण आता आपला संघर्ष संपेल त्यासाठी एकमेकांच्या मागे खंबीरपणे उभे राहा. आजपर्यंतचा आमचा संघर्ष केवळ तुमच्यासाठीच होता आणि राहणार आहे. आपल्याला संताची शिकवण आहे. भगवान बाबांची शिकवण आहे. साधुसंतांनी जात पाहून कार्य केले नाही. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनीच भगवानगड असे नाव भगवान बाबांना सुचवले आणि म्हणाले की, भगवान हे तुमच्या नावातच आहे तेच नाव राहू द्या,म्हणून भगवानगड असे नाव ठेवले. अठरापगड जातीतल्या जनतेसाठी भगवान बाबांनी कार्य केले. म्हणून तर आज सर्व अठरापगड जातीतील जनता महाराष्ट्रातून आली. भगवान भक्ती गड मेळाव्याची परंपरा भगवान बाबा पासूनच चालू आहे. त्यानंतर स्वर्गीय मुंडे साहेबांनी चालवली,आज त्यांच्या वारसदार पंकजाताई ह्या अत्यंत खंबीरपणे चालवत आहेत. आणि निर्भीडपणे चालवतात. आपणाला त्यांच्या खंबीर पाठीशी उभे राहावे लागणार आहे. असे धनंजय मुंडे यांनी संबोधित केले.

# प्रेरकांना थकीत मानधन देऊन शासकीय सेवेत सामावून घेण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे यज्ञकांत कोल्हे यांनी केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

साक्षर भारत प्रेरकांचे मागील प्रलंबित मानधन तात्काळ देऊन शासकीय सेवेत रुजू करून घेण्याच्या मागणीचे निवेदन प्रेरक संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा नांदेड जिल्हाध्यक्ष यज्ञकांत पाटील कोल्हे भायेगावकर यानी नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या सचिवा मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांना दिले आहे.

राज्यासह मराठवाड्यातील अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या १४. हजारांवर प्रेरकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रेरक संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा नांदेड जिल्हाध्यक्ष यज्ञकांत पाटील कोल्हे भायेगावकर यांनी दि.(१२) ऑगस्ट रोजी मुख्यमंत्र्यांचे सचिव बालाजी पाटील खतगावकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांना दिले आहे.सदरिल निवेदनात असेही नमूद केले आहे की,२०१२ ते २०१८ सदरील कालावधीत प्रेरकांनी साक्षर भारत कार्यक्रमाअंतर्गत निरक्षरांना साक्षर करणे,दर सहा महिन्यांनी परिक्षा घेणे, शासनाच्या विविध योजने संदर्भात जनजागृती करणे अशी विविध प्रकारची कामे केली.कोरोना काळात कोरोना योद्धाची भुमिका पार पाडली तरीही ३१ मार्च २०१८ पर्यंतचे सरासरी ५२ महिन्याचे मानधन प्रलंबित राहिले.तद्नंतरही प्रेरकांनी सामाजिक हित लक्षात घेता आपलं समाजपयोगी कार्य चालू ठेवले. सदर बाब लक्षात घेऊन प्रेरकांचे मागील प्रलंबित मानधन तात्काळ देऊन नवभारत साक्षर भारत अभियानात समावेश करून अंशकालीन कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा यांसह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

तत्पूर्वी अनेक वेळा जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय,प्रौढ प्रशिक्षण संचालक कार्यालय पुणे, नागपूर हिवाळी अधिवेशन, मुंबई मंत्रालय, संसद भवन दिल्ली येथे वारंवार अनेक आंदोलने केली सदर आंदोलनात शिवराज पाटील पवार, प्रभाकर व्यवहारे,शहाजी पाटील शिंदे,पीआर चिखल भोसीकर यासह अनेकांनी नेतृत्व करून मोर्चे काढली तरीही संबंधित राज्य व केंद्र सरकारला जागा नसल्याचे यज्ञकांत पाटील कोल्हे भायगावकर माजी प्रदेशाध्यक्ष नांदेड जिल्हाध्यक्ष यांनी सांगितले

# पहाटे ६ च्या सुमारास तुळजाभवानी मातेचा सीमोल्लंघनाचा सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धाराशिव (वृत्तसंस्था)**

श्री तुळजाभवानी देवीजींच्या शारदीय नवरात्र महोत्सवात तुळजापूर येथे आज १३ ऑक्टोबर रोजी पहाटे ६ च्या सुमारास तुळजाभवानी मातेचा सीमोल्लंघनाचा सोहळा पार पडला. श्री तुळजाभवानी मंदिरात पहाटे विधीवत पूजा व आरती करुन देवीजींचे माहेर असणाऱ्या अहिल्यानगरहून आलेल्या मानाच्या पालखीत देवीजींची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.पिंपळाच्या पारावर देवीजींची पालखी टेकवून पुन्हा आरती करण्यात आली.



मिरवणुकीनंतर प्रथेप्रमाणे पारंपारिक पध्दतीने मंत्रोच्चार,आई राजा उदो उदोचा जयघोष आणि पारंपरिक वाद्य संबळाच्या साथीने सर्व विधी करण्यात आले. तुळजाभवानी देवीजींची मूर्ती ही चल मूर्ती असल्याने ती आपलं सिंहासन सोडून सीमोल्लंघन करण्यासाठी भाविकांच्या बरोबर मंदिराच्या बाहेर येते. सीमोल्लंघनानंतर देवी पुन्हा पौर्णिमेपर्यंत निद्रा अवस्थेत जातात. यावेळी देवीजींच्या मुर्तीला इजा होऊ नये म्हणून १०८ साडया परिधान करण्यात येतात. शेवटी प्रथेनुसार अहिल्यानगरच्या भक्तांनी श्रीदेवीजींची पालखी तोडून पालखीचे होमात विसर्जन केले.यावेळी उपस्थित सर्व भाविकांनी कूंकू व फुलांची उधळण करत आई राजा उदो-उदोचा जल्लोष केल्याने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

# माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची गोळया झाडून हत्या..

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

माजी राज्यमंत्री आणि अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी मुंबई गुन्हे शाखेने दोन आरोपींना ताब्यात घेतलं आहे. यातील एकाचं नाव धर्मराज राजेश कश्यप (१९, रा. बहराईच, यूपी), तर दुसऱ्याचं नाव गुरमेल बलजीत सिंह (२३, रा. कैथल, हरियाणा) असं आहे. गुरमेलच्या आई-वडिलांचा मृत्यू झाला आहे, पण त्याची आजी जिवंत आहे आणि ती सध्या त्याच्या सावत्र भावासोबत राहते. प्रसार माध्यमाशी बोलताना गुरमेलच्या आजीने सांगितलं की, ती गुरमेलचा सावत्र भाऊ प्रिन्ससोबत राहते. २०१९ मध्ये गुरमेलने गावातील एका व्यक्तीची हत्या केली होती. तो त्यासाठी जेलमध्ये गेला होता, तीन-चार महिन्यांपूर्वीच तो जामिनावर बाहेर आला आहे. मात्र, त्याचा जामीन नेमका कोणी केला, त्याला जामीन कसा मिळाला? याबाबत कोणालाच माहिती नाही.गुरमेल जामिनावर बाहेर आल्यानंतर घरी आला होता आणि काही मिनिटच घरात थांबला. त्यावेळी त्याची आजी काही कामानिमित्त बाहेर गेली होती. तिने गुरमेलला पाहिलं देखील नाही. इतक्या कमी वेळात तो निघून गेला. त्यानंतर आजीचा गुरमेलशी कोणताच संपर्क झाला नाही किंवा तो कोणत्याही सणासाठी किंवा कौटुंबिक कार्यक्रमासाठी घरी आला नाही. गुरमेल लहानपणापासून भांडत असे, त्यामुळेच घरातील लोकांनी ११ वर्षांपूर्वीच त्याला घरातून हाकलून दिलं होतं असं देखील प्रसार माध्यमाशी बोलताना माहिती दिली.



# भिगवण-राशीन रोड बनला मृत्यूचा सापळा

## ठेकेदार,अधिकारी जाणीवपुर्वक करत आहेत दुर्लक्ष





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

भिगवण-राशीन रोड हा प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे,अशी परिस्थिती निर्माण झाली आहे,याला कारणीभूत आहे बेजबाबदार अधिकारी आणि मुजोर ठेकेदार यांचे ढिसाळ नियोजन. भिगवण राशिन रोडचे सिमेंट कॉँक्रीट करण्यासाठी १८० कोटी रुपये मंजूर झाले असून हा रोड दौंड तालुक्यातील भीमा नदी एसटी पुलापासून ते बारामती,फलटण असा असून त्याचे बऱ्यापैकी सिमेंट कॉँक्रीटरीकरण झालेले आहे.परंतु राजेगाव फार्म ता.दौंड ते खानवटे गावची कमान नंबर .१ पर्यंत अंदाजे ऐक किलोमीटर रस्ता काम करणे बाकी आहे.

या स्त्याची किमान डागडुजी करून खड्डे बुजवुन तात्काळ दुरुस्थी होणे गरजेचे आहे.खानवटे पाटी ते राजेगाव फार्म येथील रस्त्यावरती मोठमोठे खड्डे पडल्याने दररोज अपघात होत आहेत.हा रस्ता वाहतुकीसाठी अतिशय महत्त्वाचा असून चार तालुके आणि तिन जिल्ह्याच्या हद्दीवर आहे.त्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असुन याच रस्त्यावर अनेक अपघात होऊन प्रवाशांचा जिव देखील गेलेला आहे.

अजून किती जिव जाण्याची प्रशासन वाट पाहणार आहे.या रस्त्यावरून गेली अनेक वर्ष नागरिकांना आणि प्रवाशांना खड्ड्यातून मार्ग काढावा लागत आहे. म्हणून वाहतुकदार,प्रवासी आणि स्थानिक नागरिक अधिकारी आणि ठेकेदार यांच्या निष्काळजी पणामुळे नाराजी व्यक्त करत आहेत.

याबाबत इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे .यांना संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही. संबंधित मुख्य ठेकेदार व्ही.एच खत्री यांना संपर्क साधला असता ते म्हणाले की शेटफळ आणि खानवटे, राजेगाव मध्ये मला शेतकऱ्यांनी भरपूर त्रास दिला आहे. विनाकारण रस्त्याचे काम अडवून लोकांच्या जिवाशी शेतकरी खेळत आहेत. मी रस्त्याचे काम करण्यास तयार आहे परंतु मला काही शेतकरी रस्त्यावरील खड्डे सुद्धा बुजवून देत नाहीत यात माझी काही एक चूक नाही.

> **भिगवन राशीन रोडचे नवीन काम ९०% पूर्ण होत ण होत आले असून खानवटे गावाची कमान ते राजेगाव फार्म पर्यंतचा रस्ता अतिशय खराब झालेला आहे. त्या ठिकाणी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत ते तातडीने बुजवण्याची आवश्यकता आहे.अन्यथा येथे अपघातहोवून अनेक जिव जाण्याची शक्यता आहे.**
>
> **-बापूराव झोंड मा.चेअरमन खानवटे**

> **नविन सिमेंट कॉँक्रीट रस्त्याचे काम करण्यासाठी येथील काही स्थानिक शेतकरी न्यायालयात गेले असून,रस्त्याचा वाद न्यायालयीन प्रक्रियेत प्रलंबित आहे.म्हणून सध्या काम बंद आहे,परंतु वस्तुस्थिती पाहता दोन दिवसात तात्काळ खड्डे बुजविण्यात येतील.**
>
> **- डी.एम.चवरे शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग भिगवण ता. इंदापूर.पुणे.**

# भांडगाव येथील नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा मोठा प्रतिसाद

## ७९१ नागरिकांनी घेतला शिबीराचा लाभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुक्यातील भांडगाव येथे माजी बांधकाम आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे प्रविण माने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरास भांडगाव व परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने सुरवात झाली. भांडगाव प्राथमिक आरोग्य उपकेंद्र भांडगाव येथे सकाळी दहा ते पाच या वेळेत ७९१ नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली असून यातील ५२४ नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले तर १० नागरिकांची पुणे भारती विद्यापीठ येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. प्रविण माने यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा असंख्य नागरिकांनी लाभ घेतला असून प्रत्येक गावात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.



भांडगाव येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे बाळू गायकवाड,अजित मदने,सतीश पोळ,महेश गायकवाड,तुकाराम शिंदे,सनी चांडोले,निलेश रंधवे, छगन बनसुडे,अंकुश दोरकर यांनी आयोजन केले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने राजेंद्र जाधव,दिनकर गायकवाड,गायकवाड सर, शअमोल जाधव, नवनाथ गावडे,नवनाथ भोसले,कैलास शिंदे,बाळू माने,मनोहर कोकणे,गोपाळ ठोंबरे,बाळू गायकवाड, अमोल गायकवाड,सतीश पोळ,तुकाराम शिंदे,सनी चांडोले,अजित मदने,दत्तात्रय गायकवाड,रतनलाल सूर्यवंशी,मयूर लोंढे,दिपक वीर,मुबारक आत्तार, समद सय्यद,नागेश गायकवाड,संदीप सोलनकर, निलेश रंधवे,संकेत वाघमोडे,संग्राम माने,छगन बनसुडे,गणेश मोहिते,निलेश माने,दिलीप कोकणे, शंकर कोकणे,महादेव जाधव,रामचंद्र गायकवाड, गणपत राऊत,युवराज कोकणे,अण्णा लावंड,विष्णू लावंड,देविदास परकाळे कांताबाई गायकवाड आदी मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिलेला शब्द पाळतो म्हणून लोकांनी सदैव असीम प्रेम केले-आ.रायमुलकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

मेहकर लोणार तालुक्यातील जनतेने माझ्यावर नेहमीच भरभरून प्रेम केले आहे. त्यांच्या ऋणातून उतराई होणे शक्य नाही .त्यांना दिलेला शब्द मी पाळतो. म्हणूनच लोकांनीही भरभरून प्रेम दिले , असे विचार आमदार संजयराव मुलकर यांनी तालुक्यातील चिंचोली सांगळे येथे आयोजित देवी उत्सवात व्यक्त केले.

चिंचोली सांगळे येथील देवी मंडळाच्या उत्सवाची आज महाप्रसाद वितरणाने सांगता झाली. प्रमुख अतिथी म्हणून आमदार संजय रायमुलकर ,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बळीराम मापारी, विजय सानप ,शहर प्रमुख पांडुरंग सरकटे ,विश्वंभर दराडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. देहू येथील ह.भ. प. गौरीताई सांगळे यांचे कीर्तनाचा कार्यक्रम झाला.

गणेश सांगळे, सतीश सांगळे, अर्जुन सांगळे ,बाजार समिती संचालक विठ्ठलराव जाधव यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. देवी संस्थान च्या वतीने विश्वस्त संतोष सांगळे, राजीव ओंकारराव सांगळे यांनी आमदार रायमुलकर यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.



सत्काराला उत्तर देताना आमदार संजय रामुलकर पुढे म्हणाले की ,संपूर्ण मतदारसंघ हा मी एक परिवार समजतो .येथील प्रत्येक गावचा सर्वांगीण विकास करणे हा माझ्या कर्तव्याचा भाग आहे. दोन्ही तालुक्यांमध्ये ३ हजार ९०० कोटींची विकासकामे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.मी वेळोवेळी अनेकांना मदत केली, पण त्याची प्रसिद्धी करण्याच्या फंदात पडलो नाही. देवी मंदिरासाठी भविष्यात सभा मंडप बांधण्यात येईल व पुढील कार्यक्रम त्याच सभामंडपात होईल ,अशी घोषणा टाळ्यांच्या गजरात त्यांनी केली. यावेळी प्रा. बळीराम मापारी यांचेही भाषण झाले. माऊली जायभाये, गजानन जायभाये, जितेंद्र थोरवे ,विशाल थोरवे, प्रमोद थोरवे, पंढरी मानवतकर ,संतोष बोडखे आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकिशोर सांगळे यांनी केले.

# अग्नीपंखचा प्रेरणा सायकल पुरस्काराने सोमन वाघ सोनवणे सन्मानित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

आदर्श सायकल पटू स्व. डॉ संजय काळे यांचे स्मरणार्थ अग्नीपंख फौंडेशनने पहिला राज्यस्तरीय प्रेरणा सायकल पटू पुरस्कार संगमनेर येथील राष्ट्रीय सायकल पटू प्रणिता सोमन तसेच भाऊसाहेब वाघ (दौड) सिध्दार्थ सोनवणे (श्रीगोंदा) यांना प्रदान केला आहे. पारगाव सुद्रिक येथे रविवारी डॉ संजय काळे यांचे प्रथम पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून हे पुरस्कार विक्रमसिंह पाचपुते दिग्विजय नागवडे ,संपत पवार व प्रा संजय लाकूडझोडे यांचे हस्ते प्रदान करण्यात आले. दिग्विजय नागवडे यांनी अग्नीपंख फौंडेशन सायकल क्षेत्रात डॉ संजय काळे यांचे नावाने पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आणि पुरस्कार्थींची योग्य निवड केली. राष्ट्रीय सायकल पटू प्रणिता सोमन म्हणाली की, सायकल क्षेत्र हे व्यायाम आणि स्पर्धा करिअर च्या दृष्टीने महत्वाचे आहे इतर सायकल पटूंना उत्तेजन मिळावे या भावनेने अग्नीपंख फौंडेशन नेऊन प्रेरणा सायकल पुरस्कार देण्याचा चांगला निर्णय घेतला पहिल्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी माझी निवड त्याबद्दल मी ऋणी आहे. यावेळी पारनेरचे माजी सभापती संपतराव पवार माऊली हिरवे शशीकांत जगताप यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बाळासाहेब शेलार, पोपटराव खेतमाळीस, प्रशांत गोरे, नवनाथ खामकर, धीरज डांगे ,नवनाथ दरेकर ,भाऊसाहेब खेतमाळीस, राजेंद्र गांधी, विशाल चव्हाण, मारुती डाके ,प्रशांत एरंडे, लतिका वाबळे ,ॲड कावेरी गुरसल, रेखा डोंगरे उपस्थित होते. सुत्रसंचलन दत्तात्रय पाचपुते यांनी केले. यावेळी रक्तदान शिबीर घेतले यात ३५ जणांनी रक्तदान केले.

# समाज रक्षक श्रद्धेय,बाळासाहेब आंबेडकर यांच्या पाठी मागे समाजाने खंबीरपणे उभे राहावे-अशोक भाऊ सोनोने

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

बौद्ध समाज संवाद यात्रा मेहकर लोणार येथे, नागवंशी संघपाल पनाड मेहकर - लोणार वंचित विधानसभा नेते यांच्या नेतृत्वामध्ये संपन्न,

यावेळी प्रमुख मार्गदर्शक अशोक भाऊ सोनोने अमित भाई भुईगळ, राजेंद्र भाऊ पातोडे, युजी बोराडे ,प्रा.मनोज निकाळजे, यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मेहकर-लोणार येथे बौद्ध समाज बांधवां सोबत संवाद करण्यात आला. यावेळी अशोक भाऊ सोनवणे यांनी आपल्या समाज बांधवांना मार्गदर्शन करताना सांगितले की श्रद्धेय,बाळासाहेब आंबेडकर हेच खरे समाजाचे रक्षक असून, समाज बांधवांनी बाळासाहेब आंबेडकर यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहावे. संविधानाच्या



नावाखाली लोकसभेच्या निवडणुकीमध्ये समाजाचे मतदान घेऊन एका प्रकारे समाजाची दिशाभूल केली ज्यावेळेस एससी एसटीच्या आरक्षण वर्गीकरणाच, नॉन क्रिमिनल चा विषय येतो. त्यावेळेस सर्वात अगोदर अंमलबजावणी करण्यासाठी ज्या ज्या राज्यांमध्ये काँग्रेसचे सरकार आहे ते सरकार अंमलबजावणी करण्यासाठी आग्रही आहे.हे समाज बांधवांनी लक्षात घ्यावे यांच्या बोलण्यात एक आणि करण्यात एक समाजाने ओळखावे. तदनंतर राजेंद्र भाऊ पातोडे यांनी समाज बांधवांच्या प्रश्नाला उत्तरे दिली. यावेळी उपस्थित वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष निलेश जाधव, जिल्हा महासचिव प्रशांत भाऊ वाघोदे, माजी जि. प्रा. डॉ. केबी इंगळे, आबाराव वाघ, युवा नेते अनित्य घेवंदे , बळीभाऊ मोरे,ड.सुजीत मोरे, मोबिन भाई, ड, बबन वानखेडे,दीपक पाडमुख, भुजंग शिरसाट, सिद्धार्थ अवसरमोल, शाकीर भाई पठाण,दीपक अंभोरे, महेंद्र मोरे,प्रशिस इंगळे, वसंतराव वानखेडे,राहुल पाडमुख, प्रदीप सरदार,नागशेन पनाड, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण पनाड ,बबन पनाड,विलास खरात,राजहंस जावळे, श्रीराम पनाड , विशाल कंकाळ,शुध्दोधन सरदार, मंगेश पनाड,बिंबीसार पनाड, महेंद्र मधुकर पनाड, तान्हाजी अंभोरे,गजानन शेजूळ,भारत सरदार,खंडू सरदार, देवानंद वानखेडे,मा पोलीस पाटील वानखेडे, समाधान भवाळ,अनिल देबाजे,किरण ताजने, छगन खंदारे,रंजित मोरे, रमेश अवसरमोल,उषाताई नरवाडे,कमल शंकर निर्भय्य,सरकटे ताई, रूक्मिणीबाई पनाड,छायाबाई पनाड, अस्मिता पनाड ,रेश्माबाई पनाड ,हरणाबाई चव्हाण, केशरबाई जावळे,मथुबाई,सभादिंडे,तान्हाबाई पनाड,गौकर्णा मोरे,प्रयागबाई अंभोरे,गिताईबाई अंभोरे, उषाताई मोरे, पौर्णिमा पनाड यांनी परिश्रम घेतले.



**श्री.संजयजी कुलकर्णी (मा.नगराध्यक्ष उमरी) यांच्या वाढदिवसानिमित्त बालाजीराव बच्चेवार यांच्या नांदेड येथील जनसंपर्क कार्यालयात शुभेच्छा देताना यावेळी लोककल्याणकारी शेतकरी नेते मारोतराव पाटील कवळे गुरुजी,श्रावण पाटील भिलवंडे, अविनाश पाटील पवार,जयराज पाटील मोरे,ज्ञानेश्वर लोकमवार यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.**

# मा.ना.एकनाथ शिंदे मुख्यमंत्री यांची बालाजी पाटील खतगावकर यांनी नांदेड विमानतळांवर घेतली भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

दिनांक १३ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब यांचे नांदेड विमानतळावर आगमन झाले.त्यांच्या ह्या दौऱ्याप्रसंगी नांदेड येथील गुरू गोविंदसिंगजी विमानतळावर मुखेड कंधार विधानसभेचे फिक्स आमदार बालाजी पाटील खतगावकर (मुख्यमंत्री यांचे मा.सचिव) यांनी भेट घेतली. शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी खा.श्री.अशोकराव चव्हाण (माजी मुख्यमंत्री), श्री.व्यंकटराव पाटील गोजेगावकर (माजी जिल्हाध्यक्ष भाजप, नांदेड), श्री. मधुजी गिरगावकर (सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता), श्री. विवेक पाटील चोंडीकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.





# उमरखेड येथे ६८वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आनंदात साजरा

## भव्य दिव्य मिरवणूक रॅली उत्साहात संपन्न;शेकडो भीम अनुयायांनी केले बाबासाहेबांना अभिवादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड | सय्यद रहीम राजा**

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्ड येथे ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्सव सोहळा व चक्रवर्ती सम्राट अशोक विजयादशमी महोत्सव २०२४ मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. दिनांक ९ ऑक्टोंबर ते ११ ऑक्टोंबर पर्यंत विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तर दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता विश्वालासांचा संदेश देणारे महकरूनिक तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतीय राज्य शिल्पकार, महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण प्रा. डॉ.अनिल काळबांडे, भंते कीर्ती बोधी आणि हिराबाई दिवेकर यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित महिलांनी पंचशील ध्वज गीत सादर करून धम्मचक्र प्रवर्तन दिन चिरायू व्हो...! जय भीम, जय बुद्ध अशा घोषणा देऊन त्रिसरण पंचशील




ग्रहण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल पुसद अर्बन संचालक उमरखेड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा डॉ. अनिल काळबांडे, शंकर पांचाळ ठाणेदार उमरखेड, प्रकाश दुधेवार माजी नगरसेवक, वीरेंद्र खंदारे, राहुल काळबांडे, उत्तम शिंगणकर, सुनील चिंचोलकर जिल्हाध्यक्ष रिपब्लिकन युवा सेना यवतमाळ, पत्रकार सिद्धार्थ दिवेकर, कुमार केंद्रेकर अध्यक्ष शांतीदूत समिती इत्यादी जण उपस्थित होते. उपस्थित पाहुणे मंडळींचे ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन तथा रमामाता महिला मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने पुष्पगुच्छ व पंचशील शाल देऊन सत्कार करण्यात आला. तयानंतर उपस्थित मान्यवरांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त अमूल्य मार्गदर्शन करून आपले मनोगत व्यक्त केले. सायंकाळी ५ वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर वार्ड मधून भव्य मिरवणूक रॅलीचे आयोजन करून शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पुन्हा सदर राहिली डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथे संपन्न करण्यात आली. ही रॅली अतिशय शांततेच्या मार्गाने काढून संपन्न करण्यात आली. सदर रॅलीमध्ये कोणतेही अनुचित प्रकार घडणार नाही किंवा रॅलीला गालबोट लागणार नाही याची दक्षता आयोजन समितीने घेतली होती. सदर रॅली अतिशय सुंदर प्रकारे संपन्न झाल्यामुळे सर्व स्तरावरून आयोजन समितीवर अभिनंदनचा वर्षाव होतांना दिसून येते आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ दिवेकर शहराध्यक्ष भीम टायगर सेना उमरखेड यांनी केले तर आभार संतोष इंगोले यांनी मांडले. या कार्यक्रमाचे आयोजन धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्सव समिती तथा रमामाचा महिला मंडळ यांनी केले होते. तर उषाताई इंगोले अध्यक्ष भारतीय केंद्रेकर उपाध्यक्ष, कांचन दिवेकर, उज्वला धबाले सचिव, मधुबाला दिवेकर विद्या इंगोले, बेबाबाई गवंदे,सुनीता दिवेकर, राखी धबाले कोषाध्यक् , स्वाती दिवेकर, प्रज्ञा दिवेकर, रंजना आठवले संघटक तुषार पाईकराव, मनोज इंगोले, प्रफुल दिवेकर इत्यादींनी परिश्रम घेतले.

# कडा येथील शिवसंग्रामच्या आढावा बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहा–ज्ञानेश्वर चौधरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | राजू म्हस्के**

राज्यात विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्या अनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आला असून सर्वच नेते आपल्या पक्ष संघटनेचा आढावा घेत आहेत. ठिकठिकाणी दौरे, बैठका आणि मेळावे आयोजित केले जात आहेत. शिवसंग्राम सुध्दा डॉ.ज्योतिताई मेटे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकणार असल्याचे ज्ञानेश्वर चौधरी यांनी प्रसार



माध्यमाशी बोलताना सांगितले.

पुढे बोलताना चौधरी म्हणाले की, गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून लोकनेते स्व.विनायक मेटे यांनी हयातभर बहूजन समाजाच्या प्रश्नासाठी विधानपरिषदेत प्रश्न मांडीत असत,जगाला हेवा वाटेल असे भव्यदिव्य छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात पाहिजे यासाठी त्यांनी अनेक वेळा सभागृह सुध्दा बंद पाडले आणि त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय मराठा समाजाला आरक्षण ते मिळवण्यासाठी त्यांनी म्हणून शेवटच्या श्वासापर्यंत लढा दिला,विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सभागृहाबरोबर रस्त्यावरची लढाई सुद्धा लढले अशा लोकनेते स्व.विनायक मेटे साहेबांचा वसा आणि वारसा व आदर्श पुढे घेऊन डॉ.ज्योतीताई मेटे सध्या राज्यात काम करीत आहेत. म्हणून आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कडा येथे शिवसंग्रामचा आढावा बैठक आयोजित केली आहे या बैठकीत विधानसभेच्या संदर्भात पुढील रणनिती काय असेल याचे मोलाचे मार्गदर्शन मिळणार आहे यासाठी प्रमुख उपस्थिती प्रभाकर अप्पा कोलंगडे, नारायण दादा काशीद म्हणून लाभणार आहे. म्हणून यांचे विचार ऐकण्यासाठी आढावा बैठकीला तालुक्यातील बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन चौधरी यांनी केले आहे.

# लोणार शहरात दुर्गा देवी मुर्तींचे विसर्जन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**



लोणार शहरासह बुलढाना जिल्ह्यात रविवारी सकाळ पासुन ठिकठिकाणी श्री दुर्गा देवीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. ढोल ताशांच्या गजरात तसेच फटाक्यांच्या आतिषबाजीत विसर्जन मिरवणुका काढण्यात आल्या होत्या.नवरात्रोत्सवातील नऊ दिवसांमध्ये श्री दुर्गा देवीच्या विविध रूपांची पूजा पारंपरिक पद्धतीने केली जाते. प्रत्येक ठिकाणी परंपरेप्रमाणे यात बदल दिसून येतो. नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केल्यानंतर श्री दुर्गा देवीच्या मूर्तीचे विसर्जन करुन या उत्सवाची सांगता करण्यात येते.लोणार शहरात विविध मंडळांनी श्री दुर्गा देवीची विधिवत प्रतिष्ठापना केली होती. तर काही ठिकाणी देवीची प्रतिष्ठापना न करता दांडियाचे आयोजन करण्यात आले होते. अग्रवाल व माहेश्वरी समाजाने दरवर्षीप्रमाणे पारंपरिक पद्धतीने नवरात्रोत्सव साजरा केला.जिल्ह्यात नवरात्रोत्सवाची धूम गेले नऊ दिवस सुरु होती. विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन यानिमित्त करण्यात आले होते. श्री दुर्गा देवीच्या मूर्तीच्या विसर्जनानंतर या उत्सवाची सांगता झाली. विसर्जन मिरवणुकीलाही मोठ्या प्रमाणात गर्दी होती. पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला होता. नगर पालिका सर्वजनिक मूर्ती विसर्जन स्थळी मूर्तीचे शांतपणे विसर्जन करण्यात आले.

# संत सेवालाल महाराज बंजारा लमान तांडा समृद्धी योजनेत जिल्ह्यासाठी २१ कोटी ९० लक्ष रुपयाचा निधी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

संत सेवालाल महाराज बंजारा लामान तांडा समृद्धी योजना महाराष्ट्रात पहिल्यांदाच महाराष्ट्र शासनाने सुरू केली असून या योजनेचा मूळ उद्देश महाराष्ट्रातील बंजारा लमान तांड्यांना महसूल दर्जा देऊन ग्रामपंचायत निर्माण करणे आहे यानंतर बंजारा लमान तांड्यांना ज्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक तांड्यांना ३० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे,याचा पहिला हप्ता नांदेड जिल्ह्यासाठी २१ कोटी ९० लक्ष रुपयाचा उपलब्ध झाला असून महाराष्ट्रासाठी मिळालेल्या १०० कोटी रुपयांमध्ये नांदेडला २१ कोटी ९० लक्ष रुपये मिळून देण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय समितीचे सदस्य भगवान राठोड ,संध्याताई राठोड ,प्रकाश राठोड, कैलास खसावत यांनी राज्यस्तरावर प्रयत्न करून आपल्या जिल्ह्याला जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले आहे,



आपल्या जिल्ह्याला जास्तीत जास्त निधी उपलब्ध व्हावा आणि बंजारा लमान तांड्याचा विकास व्हावा यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन, आरोग्य दूत रामेश्वर नाईक, यांच्याकडे सतत पाठपुरावा करून निधी मंजूर केला आहे. ही योजना महाराष्ट्रासाठी नवीन असून नांदेड जिल्ह्यात ७५० पेक्षा जास्त बंजारा लमान तांडे आहेत या पैकी २१३ तांड्याना पाहिला हप्ता भेटलेलं आहे. किनवट ६२,कंधार २९ लोहा ११ देगलूर ४, नांदेड ५ नायगाव ३ भोकर १२ माहूर १२ मुखेड २६ मुदखेड ६ हदगाव १२ हिमायतनगर २८

अर्धापूर ३ असे एकूण २१३ तांड्याना २१ कोटी ९० लक्ष रु निधी जिल्ह्यासाठी उपलब्द झाला आहे, नांदेड जिल्ह्यात जास्तीत जास्त तांडे ग्रामपंचायत निर्माण व्हावी म्हणून जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरीय बैठका व तांड्याचा प्रवास अशासकीय सदस्यांनी केला असून वेळोवेळी राज्यस्तरावर झालेल्या बैठकीत जिल्ह्याला जास्तीचा निधी मिळावा म्हणून प्रयत्न केलेला आहे, येणाऱ्या काळात या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील तांड्याना केंद्र सरकार चा निधीचा हप्ता येणार आहे, या यजनेत मूलभूत सुविधा पुरवून तांड्याचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने तांडा विकास बोर्ड स्थापन केलेला आहे केंद्राच्या तांडा विकास बोर्डा कडे राज्यातील बंजारा लमान तांड्याचे आराखडे पाठवून् राज्याकडून मागणी केंद्र सरकार कडे गेली असल्याचे अशासकीय सदस्यांनी सांगितले.

याविषयी बंजारा समाजामध्ये आनंदाचे वातावरण असून विकास कामे दर्जेदार व्हावीत म्हणून बंजारा समाजाने याविषयी सतर्क रहावे असे आव्हान भगवान राठोड यांनी केले आहे सदरील विकास कामे ग्रामपंचायत मार्फत होणार असून ज्या ज्या तांड्यामध्ये विकास निधी मंजूर झाला आहे त्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीचे सरपंच ग्रामसेवकांनी अंदाजपत्रक बनवून तांत्रिक मान्यता घेऊन लवकरात लवकर कामे सुरू करावीत यासाठी सर्व अशासकीय सदस्य प्रयत्न करत असल्याचे भगवान राठोड यांनी सांगितले.

> **“ महाराष्ट्रातील बंजारा लमान तांड्यांना महसूल दर्जा देऊन ग्रामपंचायत निर्माण करणे आहे,यानंतर बंजारा लमान तांड्यांना ज्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेला राज्याचा ३० टक्के आणि केंद्राचा ७० टक्के निधी उपलब्ध होणार आहे,जिल्ह्यातील बंजारा तांड्यांना पहिला हप्ता २१ कोटी ९० लक्ष रुपयाचा मिळाल्याने येणाऱ्या काळामध्ये केंद्र सरकारचा ७० टक्के चा निधी उपलब्ध होणार असून विकासापासून वंचित असणाऱ्या बंजारा लमान तांड्याचा विकास होणार आहे.**

# केंद्रप्रमुख जयवंतराव काळे यांचा यात्रा महोत्सवात सन्मान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर | गणेश लोखंडे**

उस्माननगर येथून जवळच असलेल्या मौजे शिराढोण ता.कंधार येथील पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या भीमाशंकर यात्रा व नवरात्र महोत्सवात शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट, भरीव कामगिरी करणाऱ्या जयवंतराव काळे यांचा जगद्गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्या हस्ते मानवस्त्र , स्मृती चिन्ह व पुष्पहार अर्पण करून सन्मान करण्यात आला.

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी मोठ्या हर्ष उल्हासात श्री भीमाशंकर महाराज यात्रा व नवरात्र महोत्सव सोहळा पार पडला. दररोज भजन कीर्तन, प्रवचन याचे आयोजन करण्यात आले. तर ११ ऑक्टोबर रोजी रात्री गावातील गुणवंत विद्यार्थी व प्रतिष्ठित नागरिक, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते , पुरस्कार विजेते यांचा जगद्गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या सान्निध्यात व मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. श्री भीमाशंकर महाराज यांच्या यात्रा महोत्सवात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्यात आले. यावेळी शैक्षणिक क्षेत्रातील वर्ष २०२३–२०२४ अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा , सुंदर शाळा या उपक्रमात भाग घेऊन जि.प. कें. प्रा. शाळा शिराढोण या शाळेचा कंधार तालुक्यातून पहिला क्रमांक मिळविला होता. त्यांच्या कार्याची व तळमळीने केलेल्या कार्याची दखल घेऊन शिराढोण यात्रा महोत्सव समितीने जयवंतराव काळे ( केद्र प्रमुख पं.स. बिलोली ) यांचा उपस्थित महाराज व माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांच्या हस्ते मानवस्त्र, स्मृती चिन्ह व पुष्पहार अर्पण करून सन्मान करण्यात आला.

# कंधार येथे ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखों अनुयायां सोबत १९५६ साली अशोक विजयादशमी दिनी दीक्षाभूमी नागपूर इथं बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.हा दिवस धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.त्या अनुषंगाने बौद्ध समाज कंधार च्या वतीने शनिवार दि.१२ आक्टोंबर रोजी अशोक विजयादशमी दिनी ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृत्ती पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी सकाळ पासूनच विविध सामाजिक संघटना,राजकीय पक्ष आणि भीम अनुयायांनी मोठी गर्दी केली होती.सकाळी ९ वाजता भारतीय बौद्ध महासभा,माजी नगरसेवक डॉ.दिपक बडवणे,माजी नगराध्यक्ष रामराव पवार यांच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र



अभिवादन करण्यात आले.या समयी समता सैनिक दलाने धम्म ध्वजाला मानवंदना दिली.त्यानंतर सामुहिक त्रिशरण, पंचशिल ग्रहण करण्यात आले.

तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक राम रहीम नगर कंधार येथेही चौकाच्या फलकास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.त्यानंतर भारतीय बौद्ध महासभेचे पर्यटन सचिव संभाजी कांबळे यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले.तदनंतर सामुहिक त्रिशरण,पंचशिल ग्रहण करण्यात आले.यासमयी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो,भारतीय बौद्ध महासभेचा विजय असो अशा विविध घोषणांनी चौक परिसर दणाणून गेला होता.

यावेळी आनंदराव कांबळे,विलास कांबळे,नाना गायकवाड, अनिल सूर्यवंशी,अविनाश कंधारकर,संजय कदम,दिलीप जोंधळे,पत्रकार दयानंद कदम,पत्रकार राजेश्वर कांबळे,पत्रकार सिद्धार्थ वाघमारे,पत्रकार निलेश गायकवाड आदींसह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी,समता सैनिक दल,विविध राजकीय पक्षाचे कार्यकर्ते,बौद्ध,आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वासुंदे परिसरातील स्टोन क्रशर मालकांनी बनवले ग्रामपंचायतीचे नकली ना हरकत दाखले–जांबले

## खोटे दाखले बनवून परवानगी घेतल्याचा जांबलेंचा आरोप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

वासुंदे परिसरातील स्टोन क्रशर मालकांनी नकली ग्रामपंचायतीचे ना हरकत दाखले बनवून खनिकर्म विभागाकडून घेतली खाण परवानगी असा आरोप वासुंदे येथील सामाजिक कार्यकर्ते हनुमंत जांबले यांनी केला आहे.

खनिकर्म विभागाला खोटी कागदपत्रे देऊन शासनाच्या मालमत्तेवर डल्ला मारून लाखो रूपयांना चुना लावला आहे. खनिकर्म विभाग व क्रशर मालक याचं मोठ साटंलोटं आहे का तक्रारी करून देखील या लोकशाही मध्ये घटनेला,कायद्याला पुणे खनिकर्म अधिकारी का जुमानत नाहीत हा नेमका घोटाळा आहे तरी काय?असा प्रश्न जनतेला पडला आहे.



खाण मालकांनी नकली ग्रामपंचायत दाखले कोणाच्या मदतीने बनवले हा देखील मोठा संशोधनाचा विषय आहे. येथील वासुंदे गावाच्या हद्दितील कित्येक खाणी बेवारस आहेत अस समजायचे का ? नक्की कोणी उत्खनन केले आहे हेच खनिकर्म विभागाला माहित नाही का ?.एढड मोजणी नक्की रीतसर झाली का ?ती किती झाली,किती उत्खनन केले याचे उत्तर ना दौंडचे अधिकारी देतात,ना जिल्हा खनिकर्म विभागाकडून मिळते, खाण मालकांनी किती रॉयल्टी भरली आहे हे खनिकर्म विभाग माहिती देण्यास टाळाटाळ करत आहे. मग शासकीय अधिकारी खानमालकांचा पगार घेतात,का शासनाचा घेतात हे ऐखदा जिल्हा खणिकर्म विभागातील अधिकारी यांनी जनतेला सांगावे असा घणाघात हनुमंत जांबले यांनी केला आहे. रॉयल्टी विषयात नक्की काय गौडबंगाल आहे हा विषय महत्वाचा आहे.कारण करोडो रुपयाची रॉयल्टी भरली नाही,असा आरोप जाहीर करून देखील महसूल विभाग मुग गिळून गप्प का?आहे हे कधीच न सुटणारे कोड आहे. म्हणून खोटे दाखले बनवून परवानगी घेणाऱ्या खानमालकांची चौकशी करण्याची मागणी हनुमंत जांबले यांनी केली आहे.

## रोशनगाव येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नांदेड यांचा संयुक्त विद्यमानाने आयोजित

# अंधश्रद्धा पासून भोंदू बाबा व भोंदु वैद्य यांना जनतेनी बळी पडू नये-कमलाकर जमदडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

आजही ग्रामीण भागात काही ठिकाणी महिलांच्या अंगात येणे, मानसिक व शारीरिक आरोग्य चमत्कार, परिसरात अंधश्रद्धा, करनी, बुवाबाजी, भानामती हे प्रकार बगण्यास मिळतात. मात्र त्यात कोणतेही तथ्य नसते. गावातील महिला व पुरुषांनी या अश्या प्रकारच्या प्रलोभनास व भोंदू बाबाच्या अमिषाला बळी पडू नये. या गोष्टींचा विरोध केला पाहिजे. गावक-यांनी जादूटोणा विरोधी कायद्या समजून घ्यावा असे मत महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे नांदेड जिल्हा

प्रधान सचिव कमलाकर जमदडे यांनी व्यक्त केले.धर्माबाद तालुक्यातील मौ. रोषणगाव येथे नवयुवक दुर्गा मंडळ व महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आणि अंधश्रध्दा या विषयावर जमदडे बोलत होते. या विषयावर उपस्थित गावक-यांशी संवाद साधत अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी व गावातील नागरिकांना विविध प्रात्यक्षिके, सप्रयोग





दाखवण्यात आले. यावेळी बुवाबाजीच्या प्रथा, कुप्रथा आणि अंधश्रद्धा पसरवणाऱ्या प्रयोगांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. त्यामागील हातचलाखी आणि वैज्ञानिक सिद्धांत यांची सप्रयोग उकल केले. गावकऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धेपासून सावध रहावे असे पटवून सांगून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारण्याचे मार्गदर्शन जमदडे यांनी केले. यावेळी उपस्थित ज्येष्ठ नागरिक नागोराव पा रोषनगावकर, ज्येष्ठ नागरिक हनुमंतराव पाटील माळगे, मन्मथ माधवराव पा.माळगे, त्रिंबक शंकराव माळगे, प्राध्यापक नारायण अशोकराव शिवशट्टे, दुर्गा मंडळाचे अध्यक्ष, आवदुत पा जाधव, संतोष पा शिवशट्टे, साईनाथ पा शिवशट्टे, दिनेश पा जाधव, साईनाथ पाटिल जाधव, यादव पाटील जाधव, व सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे, उपसरपंच प्रतिनिधी नागनाथ माळगे, सदस्य सिद्धेश्वर पा शिवशट्टे, सदस्य विजय देवके, सदस्य प्रतिनिधी साईनाथ स्वामी ,सदस्य प्रतिनिधी संभाजी मेडेवार,सदानंद पाटील माळगे, माजी उपसरपंच अशोक पाटील माळगे , माधव पाटील शिवशट्टे, अविनाश पा माळगे, विकास शिवशट्टे, शिवलिंग जाधव, ओम माळगे, सतीश पा मा, योगेश पा माळगे, चेतन पा जाधव, बालाजी पा माळगे, शेषराव पाटील माळगे,वैजनाथ पाटील शिवशट्टे , मारोती पा शिवशट्टे, मारोती पा जाधव,सुभाष पाटील शिवशट्टे, विठ्ठल पाटील शिवशट्टे ,शिवा पाटील शिवशट्टे,गणेश माळगे, शंकर पा माळगे, परमेश्वर पा शिवशट्टे,समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समस्त गावक-यांनी या कार्याची प्रशंसा केली.

# लोणारचा ध्येयवेडा वृक्ष मित्र मयूर चव्हाण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

मयुर सातत्याने निसर्ग संवर्धन साठी झटत असतो, सुरवातीला प्रत्येक सरांच्या वाढदिवसाला एक झाड या उपक्रमाने सुरुवात करत शिक्षकांच्या वाढदिवसाला मयूर वृक्ष रोपण करत होता, हळू हळू निसर्गाशी नाळ जुळत गेली अन् मयूर झाडं लावत गेला आज रोजी मयूर ने पंचायत समिती लोणार अंतर्गत येणारी जिल्हा परिषद शाळा गोत्रा, जिल्हा परिषद शाळा सावरगाव मुंढे, जिल्हा परिषद शाळा मढी अश्या शाळा दत्तक घेत हजारो वृक्ष लागवड केले आहे, विशेष म्हणजे लावलेल्या झाडांपैकी एकही झाड मेले नाही..

त्यांचं म्हणणं आहे की दरवर्षी ग्रामपंचायत त्यांच्या स्तरावर वृक्ष लागवड करते पण त्यातले फार कमी झाड जगतात कारण आपण हवं तेव्हढ लक्ष त्या कडे देत नाही, झाडांना जेव्हड आपण प्रेम देऊ त्या जोमाने ते वाढतात,मयूर चे हे निसर्ग प्रेम बघून त्याचा बुलढाणा जिल्ह्यातील असण्याचा अभिमान वाटला..

लोणार पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी आदरणीय जंगलसिंग राठोड सर यांच्या मार्गदर्शन खाली केंद्रातील अनेक शाळा दत्तक घेत मयूर ला एक लाख झाडांचा टप्पा गाठायचा आहे अशे त्यांना विचारल्यास समजले,नुकतेच त्याने सावरगाव मुंढे येथे काही वृक्ष लागवड केले आहे आता मढी येथील शाळेत वृक्ष रोपण करण्याचे काम त्यांनी हाती घेतले आहे.. वृक्ष मित्र मयूर चे निसर्गासाठी असलेले योगदान खरंच अनमोल आहे प्रत्येक गावात अशे मयूर सारखे वृक्ष मित्र जर तयार झाले तर प्रत्येक शाळेत कोकण तयार व्हायला वेळ लागणार नाही, अश्या या ध्येयवेड्या वृक्ष मित्रास आमचं सादर प्रणाम.

# लांडे परिवाराच्या शिरपेचात आणखी मानाचा तुरा

## मच्छिंद्र लांडे यांची उत्पादन शुल्क विभागात निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

रांजणगाव गणपती.ता.शिरूर येथील सर्व सामान्य कुटुंबांतील मच्छिंद्र विलासराव लांडे या युवकाची नुकतीच महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागात निवड झाली. त्यानिमित्त रांजणगाव गणपती.ता.शिरूर पंचक्रोशीतील मान्यवरांनी त्याचा सत्कार समारंभ आयोजित करून मान्यवरांनी त्याचा सत्कार केला. मच्छिंद्र याने परिस्थितीची जाणीव ठेवत आपल्या आई वडीलांचे व भावांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करत आई 'वडिलांच्या दैनंदिन कामाला हातभार लावत दहावी पर्यतचे शिक्षण रांजणगाव गणपती गावात तर बारावीपर्यतचे उच्च माध्यमिक शिक्षण नेवासा आणि जातेगाव येथून पूर्ण केले.उच्चशिक्षण पुण्यात करत असतानाच अधिकारी बनण्याचे ध्येय उराशी बाळगून प्रचंड मेहनत, जिद्द आणि चिकाटी ठेऊन अभ्यासाची तयारी केली. त्याची नुकतीच महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागात निवड झाली हे ऐकून त्याच्या आई वडिलांना गहिवरून आले. मच्छिंद्र यांचे वडील



भारतीय सैन्य दलात आपला सेवा कार्यकाल पूर्ण करत सेवानिवृत्त झाले आहेत. मोठे भाऊ नवनाथ लांडे यांनी रांजणगाव गणपतीचे पाच वर्ष उपसरपंच पद भूषविलेले आहे तर दुसरे बंधु उद्योजक सोमनाथ लांडे हे उत्तम प्रकारे आपला व्यवसाय सांभाळत आहेत. दोन्ही भाऊ हे सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असतात. अधिकारी होणारच असे स्वप्न मच्छिंद्र यांनी बाळगले होते भावांचे व आई वडिलांचे स्वप्न व ध्येय डोळ्या समोर ठेऊन हे स्वप्न मच्छिंद्रने पूर्ण केले.त्याची ही जिद्द पाहून वडिलांसोबत अनेकांना यावेळी गहिवरून आले. दरम्यान यावेळी बोलताना जिद्द ठेवून अभ्यास करत ध्येय बाळगले तर यश नक्कीच मिळते अशी प्रतिक्रिया मच्छिंद्र याने आपल्या मनोगतात व्यक्त केली. या वेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.त्याचा सन्मान करताना शिरुर नगरपालिकेचे मा. नगरसेवक विठ्ठलशेठ पवार,देवस्थान ट्रस्ट उपाध्यक्ष संदीप दौंडकर, द युवा ग्रामीण पत्रकार संघ राज्य सहसचिव व शिरूर तालुका ग्रंथालय संघ अध्यक्ष विवेकानंद फंड,महागणपती इंग्लिश मीडियम स्कूल्स अध्यक्ष विकास शेळके,महसूल सहाय्यक अजित पडवळ,एसटीआय निलेश रासकर,पीएसआय अमोल जगदाळे, पीएसआय राहुल बांगर,माजी उपसरपंच बाबासाहेब लांडे,भानुदास शेळके,आंबेगाव शिरूर विधानसभा मनसे उपाध्यक्ष बाळासाहेब कुंभार,ग्रां.पं. सदस्य अशोक शेळके,दिनेश लांडे,निलेशबापु लांडे,सुनिल लांडे,सुर्यकांत लांडे,संभाजी शेळके, कैलासराव लांडे,रोहिदास काळे सर ,दादाभाऊ मारणे, देवेंद्र सासवडे,दादाभाऊ दसगुडे,निलेश पाचुंदकर, ग्रामपंचायतीचे व विकास सोसायटीचे आजी माजी पदाधिकारी व मच्छिंद्र यांचा मित्रपरिवार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलासराव बत्ते यांनी केले तर माजी उपसरपंच नवनाथ लांडे यांनी उपस्थित सर्वाचे मनापासून आभार मानले.

# मलिदा गँग हटाओ इंदापूर बचाओ चा नारा घेऊन मी तालुका फिरणार-अंकिता पाटील-ठाकरे

## व्याहळी येथून केली जनसंवाद यात्रेला जोरदार सुरूवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

मलिदा गँग हटाओ इंदापूर बचाओ हा नारा घेऊन मी तालुका फिरणार आहे.आज गुलाबी गँग येतेय,मलिदा गँग येतेय साड्या दिल्या जात आहेत. पण महिलांना हे आवडत नाही.मामा आणि मामांचे चार बागडबिल्ले हे ठेकेदार आहेत.त्यांनी मागील दहा वर्षात फक्त खिशे भरण्याचे काम केले आहे. त्यांना गोरगरिबांच्या प्रश्नांचं देणं घेणं नाही.साड्या वाटण्यापेक्षा महिलांच्या हाताला रोजगार दिला असता तर काय बिघडलं असतं का ?असं म्हणत आमदार दत्तात्रय भरणे यांच्यावरअंकिता पाटील-ठाकरे यांनी टीका केली. इंदापूर विधानसभेच्या प्रत्येक प्रचाराच्या शुभारंभाचा नारळ हा व्याहळी गावातील भैरवनाथाला फोडून केला जातो.त्याच भैरवनाथाला नारळ वाढवून अंकिता पाटील-ठाकरे यांनी आपल्या जनसंवाद यात्रेला आज रविवार पासून सुरवात केली आहे.आजपासून ही यात्रा तालुक्यातील प्रत्येक गावात वाडीवस्तीवर जाणार असून आगामी विधानसभेच्या पार्श्वभुमीवर आपली भुमिका मांडली जाणार आहे.

अंकिता पाटील ठाकरे म्हणाल्या की,आज अजित पवारांसोबत असणारे नेते सुरक्षित नसतील तर महाराष्ट्रातील जनता काय सुरक्षित आहे?ही पहिली घटना नाही,वारंवार अशा घटना घडत आहेत. इंदापूरात देखील मागील पंधरवाड्यात अशी घटना घडली.बारामतीत टी सी कॉलेजात ही अशीच घटना घडली.हे पाहता आपण सुरक्षित आहोत का?असा प्रश्न पडतो यासाठीचं संवाद साधण्यासाठी ही जनसंवाद यात्रा काढली असल्याचे अंकिता पाटील-ठाकरे म्हणाल्या.

जनसंवाद यात्रा दोन कारणांसाठी काढली असून त्यापैकी एक कारण म्हणजे प्रत्येकाच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी आणि आपलं पुढचं धोरण काय असेल ते सांगण्यासाठी तर दुसरं कारण म्हणजे इंदापूर तालुक्यात काही लोक सांगताहेत साडेपाच कोटींचा विकास केला आहे तो शोधण्यासाठी ही यात्रा काढली आहे.आजपासून आपल्याला तालुका पिंजून काढायचा आहे मात्र कोणावर



ही टीका करायची नाही. ८४ वर्षाच्या योध्याला साथ देण्यासाठी आपण एकत्र आलो आहोत.सुप्रिया सुळे म्हणाल्या होत्या मी माझ्या वडिलांसाठी मैदानात उतरले आहे तशीचं मी देखील माझ्या वडिलांसाठी मैदानात उतरली आहे.मागील दहा वर्षात इंदापूर तालुक्यात जी परिस्थिती निर्माण झाली ती कोणालचं बघवत नाही. खुप संघर्ष आपण केला.संघर्ष आपल्या नशिबाला का आला यासाठी आपण चर्चा करायला हवी.झालं गेलं पण ! जो उठाव तालुक्यातून होत होता तो म्हणजे भाऊ तुम्ही तुतारी घाती घ्या.म्हणूनचं जनतेचं ऐकावं लागलं.मागील सहा दशकापासून आमचे आणि पवार कुटुंबाचे नाते आहे,आणि आम्ही ते स्वर्गीय भाऊंपासून जपले आहे. मी आणि पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते सर्वांपर्यंत जाणार आहोत.संवाद साधणार आहे.त्यांनी मागील दहा वर्षात फक्त खिशे भरण्याचे काम केले आहे त्यांना गोरगरिबांच्या प्रश्नांचं देणं घेणं नाही.असं म्हणत आ.भरणेंवर अंकिता पाटील-ठाकरे यांनी टीका केली.दहा वर्षात कोणाच्या हाताला रोजगार दिला.कोणाला नोकरी मिळाली.दोन दिवसात आचारसहिंता लागणार आहे म्हणून घेतली पिशवी घातली साडी आणि सुटले सगळीगडे वाटत.पण इंदापूरची जनता हुशार आहे.सर्वांना एकत्र येऊन काम करायचं आहे.महिलांचं सबलिकरण करायचं आहे.यासाठी तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून हर्षवर्धन पाटलांना विजयी करायचे आहे.कुठल्याचं प्रकारचा प्रशासनावर वचप राहिला नाही.ही तालुक्यासाठी खूप दुर्दैवी बाब आहे.मी लेक पाटलांची आहे पण सून ठाकरेंची आहे.त्यामुळे तारतम्य बाळगून बोलते.वेळ आल्यावर मला ही डरकाळी टाकता येते हे विरोधकांनी लक्षात घ्याव म्हणत अंकिता पाटील-ठाकरेंनी इशारा दिला.आज आपल्या विविध संस्थात सर्व समाजातील ८ ते ९ हजार लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला आहे.३० ते ४० हजार कुटुंब चांगला संसार करीत आहे.तालुक्यातील औद्योगिक वसाहत आपल्याला आणखी विकसित करायची आहे.त्यासाठी हर्षवर्धन पाटील यांना साथ द्या असं आवाहन त्यांनी केले.यावेळी अतुल वाघमोडे,विकास चितारे,बाळासाहेब भोंगळे,बबलु पठाण,राजेंद्र पवार,अँड.आशुतोष भोसले,महिला तालुकाध्यक्षा छाया पडसळकर,सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सागर मिसाळ आदींनी मनोगत व्यक्त केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904